।। श्री गणेशाय नमः ।।
कुणाल वधवा
9765595037
9405171771
श्रीराम बोरवेल्स
जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.
१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे

आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ७० ■ अंक क्र.२० ■ गुरूवार २२ ऑक्टोबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26

बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

येत्या पाच महिन्यांत देशात मोठी उलथापालथ काहीकाळ देशात पंतप्रधान नसेल : राज ठाकरे

मुंबई, दि. २१ : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी देशातील राजकीय परिस्थितीवर भाष्य करत आगामी दोन ते पाच महिन्यांत देशात काहीतरी मोठे घडण्याची शक्यता व्यक्त केली आहे. देशात मोठी राजकीय उलथा-पालथ होऊ शकते, काहीकाळ देशाला पंतप्रधान नसेल, असे सूचक विधान त्यांनी केले. राज ठाकरे यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या दसरा मेळाव्यात उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांनी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवर जोरदार टीका केली



होती. देशात हुकूमशाही सुरू असल्याचा आरोप करत संजय राऊत यांनी आगामी काळात सत्ताबदल होण्याचा दाव-ही केला होता. आता राज ठाकरे यांनीही संजय राऊत यांच्या विधानाला दुजोरा देत पुढील काही महिन्यांत देशात मोठ्या घडामोडी घडू शकतात, असे म्हटले आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे म्हणाले की, संजय राऊत यांच्याशी आपले बोलणे झाले आहे. पुढील दोन ते पाच महिन्यांत देशात काहीतरी मोठे घडेल. सरकारकडून चुका होत राहिल्या आणि सध्याची परिस्थिती अशीच कायम राहिली, तर आगामी काळात देशातील जनता रस्त्यावर उतरली तर त्याचे आश्चर्य वाटणार नाही. देशातील विविध प्रश्नांमुळे लोकांच्या मनात नाराजी असल्याचेही त्यांनी नमूद केले. नीट परीक्षेच्या मुद्द्यावरून विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनाचा उल्लेख करताना राज ठाकरे म्हणाले की, हे विद्या-र्थी केवळ परीक्षेच्या प्रश्नासाठी रस्त्यावर उतरले नव्हते, तर त्यांच्या मनातील विविध प्रश्न आणि नाराजीही त्यातून व्यक्त होत होती. शांततेने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करण्याची गरज काय, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. राज्यात दुष्काळाची परिस्थिती, संभाव्य अन्नधान्याची टंचाई आणि सरकारसमोरील अन्य आव्हानांचा उल्लेख करत त्यांनी आगामी काळ सरकारसाठी कठीण ठरू शकतो, असे मत व्यक्त केले. पुढे काही काळ असा येईल, जिथे देशा-ला पंतप्रधानच नसेल, असेही राज ठाकरे म्हणाले. मात्र, या विधानामागील नेमकी परिस्थिती किंवा संभाव्य घटनांबाबत त्यांनी स्पष्ट खुलासा केलेला नाही. मतदान बॅलेट पेपरवरच व्हावे राज ठाकरे यांनी **(पान ४ वर)**

जरांगे यांनी पुरावे द्यावे चौकशी व्हावी : शिंदे



नवी दिल्ली : मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी केलेले ५०० कोटी रुपयांचे आरोप उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फेटाळून लावले आहेत. जरांगे-पाटील यांच्याकडे पुरावे असतील तर त्यांनी ते सादर करावेत, असे प्रतिआव्हान त्यांनी दिले आहे. या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे, त्यानंतर दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल, असेही शिंदे यांनी स्पष्ट केले.

मनोज जरांगे-पाटील यांनी बीड येथील दसरा मेळाव्यातून एकनाथ शिंदे यांच्याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केला होता. भाजपमध्ये अशी चर्चा असल्याचा दावा करत, एकनाथ शिंदे यांनी त्यांचे पुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांच्यामार्फत **(पान ४ वर)**

माँ रेवा शुगर प्रा.लि.येथे बॉयलर प्रदीपन

कारखान्याच्या भरभराटीसह शेतकऱ्यांना सहकार्य करणार- आ.अमरिशभाई पटेल यांचे प्रतिपादन



शिरपूर, दि.२१- शिरप-ूर शेतकरी सहकारी साखर कारखाना संचलित माँ रेवा शुगर प्रा. लि. येथे आज बॉयलर प्रदीपन कार्यक्रम संपन्न झाला असून शिरपूर तालुक्यासाठी आज सोन्याचा दिवस आहे.

माँ रेवा कंपनीने कारखाना सुरळीत चालावा, कारखान्याच्या भरभराटीसाठी शेतकरी बांधवांच्या भल्यासाठी आमचे पूर्ण समर्थन व पाठबळ असून कारखान्याची भरभराट व्हावी अशा सदिच्छा व शुभेच्छा देतो असे प्रतिपादन आमदार अमरिशभाई पटेल यांनी केले.

शिरपूर शेतकरी सहकारी साखर कारखाना संचलित माँ रेवा शुगर्स प्रा. लि. येथे गळीत हंगाम २०२६-२७ च्या प्रारंभानिमित्त दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर मंगळव-ार, दि.२० ऑक्टोबर २०२६ रोजी बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा उत्साहात पार **(पान २ वर)**

शहरात मतदार यादीतून पात्र मतदारांची नावे वगळण्याचा डाव; काँग्रेस आक्रमक, जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

धुळे,दि.२१-धुळेशहरातील मुस्लिमबहुल भागांसह विविध प्रभागांतील पात्र मतदारांची नावे मतदार यादीतून बेकायदेशीरपणे आणि चुकीच्या पद्धतीने वगळण्यासाठी कथितरीत्या मोठ्या प्रमाणावर नमुना क्रमांक ७ (फॉर्म नं.७) अर्ज दाखल केले जात असल्याचा गंभीर आरोप भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आला आहे. सुमारे २० ते २५ हजार मतदारांची नावे वगळण्याचे प्रयत्न सुरू असल्याच्या तक्रारी समोर आल्याने लोकशाही प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन हे सर्व नमुना ७ अर्ज त्वरित रद्द करण्यात यावेत, अशी ठाम मागणी काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने धुळ्याचे मा. जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

काँग्रेस पक्षाने दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, धुळे शहरातील विविध भागांतून पात्र नागरिकांची नावे हटवण्यासाठी अनधिकृतपणे अर्ज दाखल केले जात आहेत. वास्तविक नमुना क्रमांक ७ दाखल करण्याचे अधिकार -१ कडे असताना, एकच -२ कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष सर्वेक्षण न करता तब्बल ३०० ते ४०० फॉर्म नं. ७ अनधिकृतपणे सादर करत आहे. या प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले असून डॉक्टर, अभियंते, सामाजिक कार्यकर्ते, आजी व माजी नगरसेवक, शासकीय कर्मचारी तसेच स्वतः बूथ लेव्हल ऑफिसर यांच्याशी संबंधित नावांबाबतही असे अर्ज दाखल झाल्याची माहिती समोर येत आहे. धर्म, जात, समाज किंवा राजकीय विचारसरणीच्या आध-ारावर अथवा कोणत्याही अनुचित हेतूने पात्र **(पान २ वर)**

सोनगीरला आज बालाजी रथोत्सव

सोनगीर, दि. २१(प्रतिनिधी) येथे भगवान बालाजी रथोत्सव आज संपन्न होत आहे. रथाची साफसफाई करण्यात आली आहे. भगवान बालाजींच्या दर्शनासाठी व रथाला ओडण्यासाठी परी-सरातील गावाहुन भाविक मोठ्या संख्येने हजेरी लावतात .

आज दुपारी साडेबारा वाजेच्या मुहूर्तावर रथयात्रा निघणार असून आनंदवन संस्थानचे मठापती डॉ मुकुंदराज महाराज यांच्या हस्ते पुजा व महाआरती होणार आहे. विठ्ठल मंदिराजवळील रथ घरा-पासून रथयात्रेस सुरुवात होवून शिवशक्ती चौक, संत रोहिदास चौक, डॉ.आंबेडकर चौक, बजरंग चौक, यूनियन बँक, गांधी चौक, ग्रामपंचायत **(पान ४ वर)**

शेतकऱ्यांचा सामूहिक आत्महत्येचा इशारा; प्रांत अधिकाऱ्यांना दिले निवेदन

धुळे, दि.२१- मौजे गोंदूर, निमडाळे आणि भोकर परिसरातील शेतकऱ्यांनी अव-ादा एनर्जी कंपनीच्या त्रास-ाला कंटाळून थेट सामूहिक आत्महत्येची परवानगी मागण-ारे खळबळजनक निवेदन धुळे उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले आहे. कंपनीकडून सातत्याने दिला जाणारा त्रास तात्काळ बंद न झाल्यास सामूहिक आत्महत्या करण्याचा इशारा संतप्त शेतकऱ्यांनी या निवेदनाद्वारे दिला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गोंदूर, निमडाळे व भोकर परिसरात अवादा एनर्जी कंपनीचे मनोरे उभारण्याचे प्रस्तावित आहे. यासंदर्भात २१ मे २०२६ रोजी मा. उपविभागीय अधिकारी यांच्या उपस्थितीत सुनावणी झाली होती. त्यानंतर ७ ऑक्टोबर २०२६ रोजी पालकमंत्री तथा राजशिष्टाचार मंत्री यांच्या उपस्थितीत मा. जिल्हाधिकारी यांच्या दालनात विशेष बैठक पार पडली. या बैठकीत सर्व बाधित शेतकऱ्यांनी अवादा एनर्जीचे मनोरे आपल्या शेतात जाऊ देण्यास एकमुखाने तीव्र विरोध दर्शवला होता.

शासननिर्णय ०१/१२/२०२२ मधील मुद्दा क्रमांक-०४ नुसार, जोपर्यंत बाधित शेतकरी स्वतः च्या मर्जीने १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर नोटरीकृत संमतीपत्र, प्रतिज्ञापत्र किंवा मुखत्यारपत्र लिहून देत नाहीत, तोपर्यंत कोणतीही पारेषण परवानाधारक कंपनी शेतकऱ्यांच्या शेतात प्रवेश करू शकत नाही. **(पान ४ वर)**

आज ४६ वी पुण्यतिथी

वालचंदजी लखीचंदजी चौधरी उर्फ महात्माजी



सेठ स्वर्गीय

वालचंदजी उर्फ (महात्माजी) लखीचंदजी चौधरी स्वर्गवासी हुये। स्व.दि.२०/१०/१९८० अश्विन शु।।एकादशी स्व.पिताश्री महात्माजी) आपकी पुण्यतिथी पर हम सब उस पवित्र आत्माके प्रति नतमस्तक है, जिनकी प्रबल कर्मशीलता, आदर्श, स्नेह, मार्गदर्शन एवं मृदुस्वभाव ही हमे प्रेरणादायी हुआ है। आपकी पावनस्मृती में हम अश्रुपूरित श्रध्दांजली अर्पित करते है।

❊ आपके नतमस्तक ❊

कांतीलालजी, जयंतीलालजी, राजेंद्र कुमार एवं समस्त चौधरी (चोरडीया) परिवार, धुलिया.

अजनाळ्याचा चॅम्पियन चव्हाणला अटक पो.अधीक्षकांनी गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे

धुळे, दि.२१- देवळा (जि. नाशिक) येथील एकाच्या फसवणूक प्रकरणी गेल्या अनेक वर्षापासून बेपत्ता असलेला संशयित चॅम्पियन ऊर्फ विनोद ज्ञानबाचव्हाण याला स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. २०२५ च्या ३९५ च्या गुन्ह्यात ही अटक झाली असून आर्म ॲक्टचे कलमे देखील या मध्ये लावण्यात आली होती. त्याला धुळे तालुका पोलिसांच्या स्व-ाधीन करण्यात आले आहे. चॅम्पियन चव्हाणच्या अटकेच्या प्रकरणात पोलीस अधीक्षक विशाल सिंगुरी यांनी अधीक लक्ष घातल्यास कुसूंबा मालेगाव रस्त्यावरील मोठ्या प्रमाणात होणाऱ्या लूटमार, अवैध धंदे, व या परिसरात सक्रिय असणाऱ्या सर्व चोरट्यांच्या टोळ्या यांना आळा बसण्याची शक्यता असल्याने सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.

चॅम्पीअन ऊर्फ विनोद ज्ञानबा चव्हाण रा.अजनाळे ता.धुळे याच्या संदर्भात अनेक गंभीर स्वरूपाचे आरोप लावण्यात येतात. कुसूंबा रोडवरती मोठ्या प्रमाणात घडलेल्या गुन्ह्यांशी त्याचा संबंध असल्याचे सांगितले जाते. नकली नोटांच्या संदर्भात देखील या भागात बरीच चर्चा असून एक लाख आणा चार लाख घ्या असे देखील प्रकार होत असल्याचे जनतेतून बोलले जाते. यामुळे चॅम्पियनला अटक होणे ही फार मोठी घटना गुन्हेगारी क्षेत्रात असल्याचे सांगितले जाते. विशेष म्हणजे २०२५ च्या ३९५ च्या केसमध्ये देवळा येथील एका व्यक्तीला बोलवून लुटण्यात आले होते. त्याच्यात देखील पैशांचा व्यवहार असल्याचे सांगितले जाते. या केसमध्ये आर्म ॲक्टचे देखील कलमे लावण्यात आली होती. तालुका पोलीसांना हवा असलेला चॅम्पियन चव्हाण हा तेव्हापासून तालुका पोलीसांना सापडून येत नव्हता. यामुळे तालुका पोलीसांची भूमिका संशयास्पद दिसते. पोलीसांच्या एका मोहिमेमध्ये फरार आरोपींच्या यादीतून चॅम्पियन चव्ह-ाणचे नाव कसे वगळण्यात आले ? याची देखील सखोल चौकशी होणे गरजेचे असून २०२५ च्या ३९५ केसमध्ये आपणावर खोटा गुन्हा दाखल केला आहे. यासाठी त्याने हाय कोर्टात गुन्हा रद्दबातल व्हावा यासाठी याचिका दाखल केली असल्याचे सांगितले जाते.

कुसूंबा रोड येथे सायंकाळ नंतर आम जनता प्रवास करण्यासाठी सुध्दा घाबरायची. रस्त्यावर ग्रीस लावून किंवा ऑईल टाकून जे दुचाकी वाहने घसरून पडायची त्यांना मारहाण करून लूटमार करणे. अपघातग्रस्त गाड्यांमधील प्रवाशांचे साने, नाणे पैसा लुटणे असे अनेक प्रकार या भागातील सक्रीय गँग मार्फत होत असल्याने धुळे पोलीस अधीक्षक विशाल सिंगुरी यांनी अधीक लक्ष घालून या गुन्हेगारीचा बिमोड करावा. अशी जनतेची अपेक्षा आहे.

मांजा गळ्यात अडकला दुचाकीस्वार जखमी

धुळे, दि.२१- प्रतिबंधित नायलॉन मांजा गळ्यात अडकल्याने दुचाकी स्वार गंभीर जखमी झाल्याची घटना देव-पूर परिसरात घडली. जखमीवर खासगी रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली असून उपचार सुरू आहेत. रुपेश प्रकाश जाधव (वय ४४, रा. **(पान ४ वर)**

हार्दीक अभिनंदन

श्री महाराजा अग्रसेन की जय

अग्रवाल विद्यार्थी शिक्षण सहाय्यक मंडळ, धुळे

फोन नं.(०२५६२-३५९३७४)

अग्रवाल विश्राम भवन/राजस्थान भवन/अग्रसेन लॉन/छत्रपती महाराजा अग्रसेन हॉल पांझरा नदी किनारी, शिवाजी रोड, धुळे-४२४००१

अग्रवाल विद्यार्थी शिक्षण सहाय्यक मंडळच्या झालेल्या निवडणुकीत बिनविरोध निवडून आलेल्या पदाधिकारी व संचालक मंडळ यांना हार्दिक अभिनंदन!

नवनिर्वाचित कार्यकारी पदाधिकारी (कार्यकाळ - २०२६ ते २०३१)



श्री विनोद प्रभुदयालजी अग्रवाल (विनोद शेठ) (अध्यक्ष)



श्री अनुप सुभाषजी गिंदोडिया (रावसाहेब) (सेक्रेटरी)



श्री रविंद्र पुरणमलजी अग्रवाल (पप्पू शेठ) (उपाध्यक्ष)



श्री पियुष राजेंद्रप्रसादजी अग्रवाल (खजिनदार)

नवनिर्वाचित विश्वस्त मंडळ

श्री.संजय काशिनाथजी अग्रवाल (विश्वस्त)
श्री.गिरिष प्रभुदयालजी अग्रवाल (विश्वस्त)
श्री.राजेश घनश्यामदासजी गिंदोडिया (विश्वस्त)
श्री.सुनिल बजरंगलालजी अग्रवाल (विश्वस्त)
श्री.दिनेश रसिकलालजी अग्रवाल (विश्वस्त)
श्री.सुनिल शांतिलालजी अग्रवाल (विश्वस्त)
श्री.संजय मुरलीधरजी पोद्दार (विश्वस्त)
श्री.निरज दिपचंदजी अग्रवाल, अमळनेर, (विश्वस्त)
श्री.सतिष रामलालजी अग्रवाल (विश्वस्त)
श्री.पवन श्रीकिसनजी अग्रवाल (विश्वस्त)
श्री.प्रीतेश दिनेशजी गिंदोडिया (विश्वस्त)

शुभेच्छुक



श्री ओमप्रकाश पुरणमलजी अग्रवाल



श्री दिनेश ताराचंदजी गिंदोडिया

(मॅनेजर) श्री विक्रम कैलाश केडिया व समस्त कर्मचारी वृंद

दिपक ज्वेलर्स

सोने- 22 K -1,33,250 रु.+3% GST
सोने- 24 K -1,45,150 रु.+3% GST
चांदी- 2,11,500 रु.+3% GST

तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

जवाहर मेडिकल फाऊंडेशनचे
संस्थापक अध्यक्ष, खान्देशरत्न व वैद्यकीय क्षेत्रातील भीष्माचार्य.



कै. डॉ. अण्णासाहेब भाईदास चुडामण पाटील

यांच्या स्मृतिदिनानिमित्त

विनम्र अभिवादन !

दि. 22 ऑक्टो.

ए.सी.पी.एम. मेडिकल कॉलेज। ए.सी.पी.एम. डेंटल कॉलेज। ए.सी.पी.एम. नर्सिंग कॉलेज।
डॉ. बी. सी. पाटील कॉलेज ऑफ फिजियोथेरपी। साक्री रोड, मोराणे, धुळे - 424 001

आपला महाराष्ट्र

श्रद्धा, अंधश्रध्दा आणि अदृश्य झालेला विवेक

दसरा संपला. नऊ दिवसांचे नवरात्र संपले. एकीकडे दुष्काळाच्या बातम्या, कथा, त्याची तीव्रता, सरकारवर टीका, पाच हजार रुपये गोळा करून सरकारला दिलेला आहेर हे सगळे चालू असताना दुसरीकडे शहरात नवरात्राच्या उत्साहाला ऊत आला होता. दुष्काळ पडो की अजून काही होवो आम्ही आमची परंपरा आणि संस्कृती सोडणार नाही भलेही बिना पाण्याचे राहू असाच संदेश या नवरात्रांनी दिला असे म्हणणे भाग आहे. नवरात्रातील नवरंगांची एक फार चांगली कथा यादरम्यान वाचायला मिळाली. मुंबईतल्या मोठ्या खपाच्या वृत्तपत्राच्या संपादकांनी २००३ मध्ये तेवढ्याच मोठ्या वृत्तपत्राचा खप आपल्यापेक्षा अधिक वाढल्यामुळे तो कमी करण्यासाठी एक शक्कल लढवली. त्यांनी नवरात्रींपैकी प्रत्येक दिवसाचे वैशिष्ट्य म्हणून महिलांना त्यातल्या त्यात मुंबईतल्या महिलांना नऊ दिवसांच्या नऊ रंगांच्या साड्या परिधान केलेल्यांनी आपले फोटोग्राफ काढून ते आपल्या वृत्तपत्राकडे पाठविण्याचे आवाहन केले. त्यामुळे या वृत्तपत्रात रोज ठरवून दिलेल्या रंगांच्या साड्या परिधान करून फोटो पाठवणारांची गर्दी वाढली. चार पाने त्यासाठी अपुरी पडू लागली. परिणाम असा झाला की मुंबईच्या लोकलमध्ये आणि प्लॅटफॉर्मवर रोज विशिष्ट रंगांच्या साड्या परिधान केलेल्या महिला दिसू लागल्या. त्यामुळे संबंधित वृत्तपत्राचा खप निश्चितच वाढला. २००३ पासून आज पर्यंत २३ वर्षे झाली तरी हे जे रंगांचे गारुड आहे ते कायम दिसले. यापूर्वी शेकडो हजारो वर्षे झाली तरी कुठल्याही पुराणात किंवा पुरणातील इतिहासात कोणत्या दिवशी कुठल्या रंगाची साडी परिधान करावी असा उल्लेख नाही. परंतु दुनिया झुकती है झुकानेवाला चाहिये अशा पद्धतीने एक ढूंढो हजार मिल जायेंगे अशा रीतीने हा प्रयोग यशस्वी झाला. वृत्तपत्राच्या खपासाठी हा प्रयोग झाला असे कितीही आता ओरडून सांगितले तरी नवरात्रीतले रंग काही बदलले नाहीत अशी अवस्था निर्माण झालेली आहे.

याचाच अर्थ विवेक वादाला कुठेच जागा राहिलेली नाही. शिकले सवरलेले सायन्सचे विद्यार्थी देखील हे सगळे करतात. रात्रभर गरबा खेळून चार वाजता देवीच्या दर्शनाला जाणाऱ्या महिलांच्या झुंडीच्या झुंडी आपण बघितल्या. पूजा अर्चा मोठ्या प्रमाणावर झाल्या. त्यामुळे श्रद्धा आणि अंधश्रद्धा, भक्ती आणि कर्मकांड यातल्या सीमारेषा फारच पुसट झालेल्या अलीकडच्या काळात दृष्टीस पडत आहेत. म्हणजे विज्ञानवादी एकविसाव्या शतकातला समाज कुठे जात आहे हा चिंतेचा विषय ठरू शकतो नव्हे ठरलेला आहे. दुसरी सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या काळात झालेले अपघात होत. देवीच्या दर्शनाला जाणाऱ्या डझनावारी भाविकांना मृत्यूच्या सामोरे जावे लागले. तुळजापूर येथे तुळजाभवानीच्या दर्शनासाठी निघालेली मोटार राज्य परिवहन महामंडळाच्या बसला धडकली आणि त्यात पाच भाविकांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना खामगाव पंढरपूर महामार्गावर झाली. सर्व भाविक हे माजलगावचे होते आणि तिथून ते तुळजापुरला निघाले होते. दुसरी घटना नवरात्रातीलच आहे. पश्चिम बंगाल मध्ये पूजा मंडपावर झालेल्या पावसामुळे प्रचंड पळापळ झाली. गर्दी एवढी होती की त्या पळापळीत चेंगराचेंगरी झाली आणि सुमारे १७ जणांचा मृत्यू झाला. तिसरी घटना ग्वालियर मधली आहे. मध्य प्रदेशातील ग्वालियर जिल्ह्यात गेल्या रविवारी पहाटे नवरात्रीच्या पूजेसाठी शितला माता मंदिरासमोर जमलेल्या भाविकांच्या गर्दीत मालवाहू ट्रक घुसला त्यात सुमारे पंधरा भाविकांचा मृत्यू झाला. अनेक जखमी झाले. त्यातील काही मृत्युमुखी पडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आलेली आहे. याच पद्धतीने दरवर्षी कुठे ना कुठे देवीच्या यात्रेमध्ये रांगेत चेंगराचेंगरी होते. आणि लोक सहज मृत्युमुखी पडतात. मागे एकदा उज्जैनच्या महाकालेश्वर मंदिरात अशाच प्रकारे गर्दी होऊन असंख्य लोक ठार झाले होते. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील.

देव दर्शनाला जाताना अपघात होऊन शेकडो लोक ठार झालेले आहेत. या घटना घडल्यानंतर शासन प्रमुख दुःख व्यक्त करतात. प्रशासकीय अधिकारी दुःख व्यक्त करतात. मृतांच्या कुटुंबियांना काही लाखाची मदत घोषित केली जाते. जखमींसाठी काही व्यवस्था केली जाते. परंतु त्यावर मूलभूत अशा उपाययोजना होत नाहीत. ग्वालियर पश्चिम बंगाल आणि तुळजापूरच्या अपघातानंतर अशाच दुःख व्यक्त करणाऱ्या प्रतिक्रिया बाहेर आल्या. आर्थिक मदत जाहीर झाली. आपण सगळेच या घटना विसरलो. नवी घटना, नव्या प्रतिक्रिया, असा सगळा सिलसिला पुढेही चालू राहील. या संदर्भात एक मूलभूत प्रश्न उपस्थित झालेला दिसला आणि तो म्हणजे ज्या देवाच्या किंवा देवीच्या दर्शनाला भाविक जातात त्यांना संबंधित देव किंवा देवी का वाचवित नाहीत. या प्रश्नाचे उत्तर देताना बहुतांश अंधश्रद्धाळू किंवा अंध भक्त असे म्हणतात की त्यांना सद्गती मिळाली. ते देवाच्या चरणी लीन झाले. असा विचार किंवा चिंतन ज्या देशात आहे तो देश एकविसाव्या शतकात किंवा सहस्त्रकात कितपत विवेकवादी प्रगती करू शकेल असा मोठा प्रश्न आहे. त्याचे उत्तर नकारार्थी येते. श्रद्धा आणि अंधश्रद्धेच्या मधील सीमारेषा अतिशय पुसट आहेत. त्या हळूहळू नष्ट होतील आणि दहा वीस टक्के समाज विवेकवादी तर ७० ते ८० टक्के समाज हा अविवेकी किंवा अंधश्रद्धाळू असेल. असा समाज आपला देश कसा घडविणार आहे यासाठी फार काही विचार करण्याची आवश्यकता नाही हे सर्व उघड दिसतें. विज्ञान आणि संस्कृती यांची वाटचाल विषम दिसत आलेली आहे. शतकानु शतके भौतिक विकास किंवा वैज्ञानिक विकास हा जेव्हा १०० पावले पुढे चालतो तेव्हा सांस्कृतिक विकास हा फक्त दहा पावले पुढे जात असतो. एवढी विषम परिस्थिती आहे. सांस्कृतिक विकासाची सांगड भौतिक किंवा वैज्ञानिक विकासाशी आतापर्यंत घातली न गेल्यामुळे वैचारिक मागासले पण कायम आहे. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होऊन पाच वर्षे झाली तरी हा जो विज्ञान आणि संस्कृतीचा वेग आहे त्यात काही बदल झालेला नाही. म्हणूनच लोक किड्या मुंग्यांसारखे मृत्यू पावतात. आणि त्याला सद्गती मिळाली असे म्हणतात. वैचारिक दृष्ट्या असलेली आणि चालत आलेली ही जी काही पोकळी आहे ती कशामुळे आहे आणि कशी भरून निघेल यावर कधी चर्चा होत नाही. सध्याचा काळ असा आहे की अशी चर्चाच उपस्थित होऊ द्यायची नाही. कर्मकांड आणि परंपरा यांना प्रोत्साहन देणारा हा काळ आहे. त्यामुळे पुन्हा १९४७ पर्यंत मागे आपण जातो की काय अशी अवस्था तयार होऊ पाहत आहे.

शिक्षणात देखील जुन्या परंपरांचा उल्लेख अभ्यासक्रमात होत आहे. ज्यांची आवश्यकता नाही अशा बाबी अभ्यासक्रमात घातल्या जात आहेत. कोणत्या राजाला कोणत्या देवीने तलवार दिली आणि त्या तलवारीने त्यांनी युद्ध जिंकले अशा प्रकारच्या लोककथा प्रचलित आहेत हे देखील अभ्यासक्रमात मांडण्याची गरज नाही. पण असा अट्टाहास करणारा वर्ग अभ्यासक्रम समितीमध्ये असून त्यांनी हा वेगळाच बदल घडवून आणण्याचे ठरविलेले दिसते. त्यामुळे शिक्षणातून वैज्ञानिकांचे सिद्धांत काढून टाकले जात असतील आणि त्याऐवजी देवीने दिलेल्या तथाकथित तलवारीची चर्चा होत असेल तर आपण कुठे निघालो आहोत नेमके ते लक्षात येते. ही जबाबदारी नेमकी कोणाची असाही प्रश्न आहे. कारण जे धोरणकर्ते आहेत तेच जर टाकाऊ विचारसरणीचा अंगीकार करत असतील आणि पुढच्या पिढीच्या पुढ्यात तोच अभ्यासक्रम टाकत असतील तर टाकाऊच पिढी निर्माण होईल यासाठी कुठलेही ज्योतिष बघण्याची आवश्यकता नाही.एकविसाव्या शतकात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने प्रचंड प्रगती केली आहे. आपण अंतराळात पोहोचलो, वैद्यकीय क्षेत्रात नवनवीन संशोधन झाले, संवादाची साधने बदलली आणि मानवी जीवनाच्या असंख्य क्षेत्रांत क्रांती घडली. परंतु या भौतिक आणि वैज्ञानिक प्रगतीच्या तुलनेत समाजाच्या विचारपद्धतीत किती बदल झाला, हा प्रश्न उपस्थित करावा लागतो.विज्ञानाचा उपयोग करणारा प्रत्येक माणूस वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगतोच असे नाही. मोबाईल, संगणक, इंटरनेट आणि आधुनिक वाहने वापरणारा माणूसही परंपरेच्या नावाखाली अविवेकी समजुती स्वीकारू शकतो. विज्ञानाची साधने वापरणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.भौतिक प्रगती आणि सांस्कृतिक प्रगती यांची गती समान नसल्याचे आपल्या समाजात अनेकदा दिसते. वैज्ञानिक शोध आणि तंत्रज्ञानाचा विकास झपाट्याने होतो; मात्र सामाजिक समता, विवेक, स्त्री–पुरुष समानता आणि चिकित्सक विचार यांच्या बाबतीत बदलाची गती मंद असते. त्यामुळे आधुनिक साधनांनी सुसज्ज असलेला समाज विचारांच्या बाबतीत मागासलेला राहण्याची शक्यता अधिक निर्माण होते.आपल्या समाजात किती टक्के लोक विवेकवादी आहेत आणि किती अंधश्रद्धाळू आहेत. सार्वजनिक जीवनात विवेकवादी विचारांना किती महत्त्व दिले जाते, शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टिकोन किती विकसित होतो आणि सामाजिक प्रश्नांकडे पुराव्यांच्या आधारे पाहण्याची तयारी किती आहे, यावरून समाजाच्या वैचारिक स्थितीचा अंदाज सहजपणे घेता येतो.

भरधाव ट्रकची धडक दुचाकीस्वाराचा मृत्यू

नंदुरबार, दि.२१(प्रतिनिधी)- अक्कलकुवा तालुक्यातील जामली फाटा परिसरात अंकलेश्वर-बऱ्हाणपूर महामार्गावर भरधाव ट्रकने दुचाकीला मागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात पेचरीदेव येथील लक्ष्मण आट्या वसावे (वय ५४) यांचा मृत्यू झाला. २० ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी हा अपघात घडला. अपघातानंतर संबंधित ट्रकचालक घटनास्थळावरून पसार झाला.

लक्ष्मण वसावे हे पेचरीदेव येथून होंडा साइन दुचाकीने तहसील कार्यालय, अक्कलकुवा येथे कार्यालयीन कामासाठी जात होते. जामली फाटा येथील यामिनी हॉटेलजवळ त्यांच्या दुचाकीला मागून आलेल्या ट्रकने जोरदार धडक दिली. त्यामुळे त्यांची दुचाकी पुढे चालणाऱ्या दुसऱ्या ट्रकवर जाऊन आदळली. या अपघातात वसावे यांच्या डोक्याला, छातीला आणि उजव्या हाताला गंभीर दुखापत झाली. त्यात त्यांचा मृत्यू झाला. अपघातास कारणीभूत ठरलेला ट्रकचालक अपघाताची माहिती न देता पळून गेल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणी अक्कलकुवा पोलीस ठाण्यात अज्ञात ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक अर्जुन पटले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार रविंद्र कोराळे तपास करीत आहेत.

नाडसे केंद्राची शिक्षण परिषद उत्साहात संपन्न

साक्री, दि.२१(प्रतिनिधी)- साक्री तालुक्यातील नाडसे केंद्राची मासिक शिक्षण परिषद जिल्हा परिषद शाळा विटाई येथे पार पडली. मूल्यवर्धन उजळणी बाबत मार्गदर्शन करतांना,कासारे बीटाचे शिक्षण विस्तार अधिकारी जितेंद्र भामरे यांनी मूल्यवर्धन उपक्रमांची प्रभावी आणि परिणामकारक अंमलबजावणी करून विद्यार्थ्यांमध्ये विविध संस्कार मूल्य विकसित करण्याचे आवाहन केले.

शिक्षण परिषदेत विशेष मूल्यवर्धन उपक्रमां बाबत जिल्हास्तरीय सुलभक यांनी सत्र निहाय मार्गदर्शन केले. शिक्षण परिषदेच्या अध्यक्षपदी निळगव्हाण शाळेचे मुख्याध्यापक श्री. विलास सोनवणे होते, त्यांनी विविध विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले .शिक्षण परिषद नियोजित तासिकेत पि.एम.श्री.जिल्हा परिषद शाळा धमनार शाळेच्या उपक्रमशील शिक्षिका श्रीमती जोत्सना पाटील यांनी, अध्ययन निष्पत्ती आधारित मासिक पाठ नियोजन कसे करावे,याचे शिक्षकांकडून गटकार्य करून घेतले.धमनार शाळेच्या प्रतिभा देसले,बेहेड शाळेच्या शिक्षिका सीमा पवार,दगडीमाळ शाळेचे अमोल नेरकर यांनी शाळेतील मूल्यवर्धन उपक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे सादरीकरण केले. मुख्याध्यापक श्री. अरुण खैरनार यांनी विशेष मूल्यवर्धन उजळणी प्रशिक्षणाबाबत उद्देश,सहा लक्ष्ये याविषयी मार्गदर्शन केले. शशिकांत बच्छाव,दिनेश गांगुर्डे, अंकुश खैरनार, ह्याळीज सर , विकास बोदडे, भरत देवरे, खुशाल अडगळे, सुनिता देवरे, संगीता मोरे यांनी सहभाग घेतला.

पान १ वरुन

शहरात मतदार यादीतून पात्र मतदारांची नावे वगळण्याचा

मतदारांना हक्कापासून वंचित ठेवण्याचा हा प्रयतक असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.

या गंभीर समस्येवर तोडगा काढण्यासाठी काँग्रेस पक्षाने धुळे शहरातील मतदारांची नावे वगळण्यासाठी प्राप्त झालेले फॉर्म नं. ७ अर्ज तातडीने रद्द करण्यात यावे, मुस्लिमबहुल भागांसह धुळे शहरातील सर्व प्रभागांमध्ये नमुना क्रमांक ७ अंतर्गत प्राप्त अर्जांची संख्या, स्वरूप आणि त्यामागील वस्तुस्थितीची सखोल तपासणी करण्यात यावी, कायदेशीर प्रक्रियेचे काटेकोर पालन करून कोणत्याही पात्र मतदाराचे नाव चुकीच्या पद्धतीने वगळले जाणार नाही याची पूर्ण जबाबदारी प्रशासनाने घ्यावी, खोटी माहिती, बनावट कागदपत्रे किंवा नियमबाह्य पद्धतीचा वापर करून नावे वगळण्याचा प्रयतक झाल्याचे सिद्ध झाल्यास दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, सक्षम मतदार नोंदणी अधिकारी व संबंधित निवडणूक प्राधिकरणाने या प्रक्रियेवर तातडीने देखरेख ठेवून नियमांचे पालन सुनिश्चित करावे, सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची तातडीने बैठक आयोजित करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी व मतदार यादी पडताळणीत पूर्ण पारदर्शकता ठेवावी आणि ज्या पात्र मतदारांची नावे चुकून वगळली गेली असतील त्यांना लागू नियमांनुसार तात्काळ नाव पुनर्स्थापित करण्यासाठी किंवा मतदार नोंदणी दुरुस्त करण्यासाठी मदत करण्यात यावी, अशा एकूण ७ प्रमुख मागण्या जिल्हा प्रशासनासमोर मांडल्या आहेत.

लोकशाही व्यवस्थेत मतदानाचा अधिकार हा मूलभूत पाया असून, पात्र नागरिकांची नावे अनधिकृतपणे वगळल्यास निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास उडेल, अशी भीती निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रति मा. मुख्य निवडणूक अधिकारी (महाराष्ट्र राज्य), मा. मतदार नोंदणी अधिकारी (संबंधित विधानसभा मतदारसंघ, धुळे) आणि मा. उपविभागीय अधिकारी (धुळे) यांनाही माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी पाठवण्यात आल्या आहेत. तसेच केलेल्या कार्यवाहीचा लेखी अहवाल तात्काळ उपलब्ध करून देण्याची विनंतीही करण्यात आली आहे.

हे निवेदन देतेवेळी काँग्रेस पक्षाचे अमीन पटेल, अबूलास खान, आसिफ अन्सारी, असलम अन्सारी, अब्दुल हफिज, रईस रजब, नविद अन्सारी, सरवर अन्सारी, मुजाहिद, जुनेद, खलील अन्सारी, रमजान टेलर, इरफान मनियार, वकील अन्सारी, अजीज अन्सारी, इमरान टेलर, महेमुदुल हसन, मोहम्मद जहिर, कुर्बान अन्सारी, मोहसिन शाह, नाट्या वस्ताद आणि असीफ मसाले वाले हे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. लोकशाही वाचवा! संविधानाचे संरक्षण करा! मतदारांचा अधिकार सुरक्षित ठेवा! अशा घोषणा देत काँग्रेसने प्रशासनाला त्वरित हस्तक्षेप करण्याचे आवाहन केले आहे.

पान १ वरुन

कारखान्याच्या भरभराटीसह शेतकऱ्यांना सहकार्य

पडला. माजी मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली आणि आमदार काशिराम दादा पावरा यांच्या शुभहस्ते व माँ रेवा शुगर्स प्रा. लि.चे संचालक अंकित गोयल यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवाजीनगर, दहिवद येथील कारखान्यात दुपारी १२.१५ वाजता हा कार्यक्रम संपन्न झाला. आमदार अमरिशभाई पटेल म्हणाले की, माँ रेवा शुगर्सच्या माध्यमातून साखर कारखाना सुरळीतपणे सुरू राहणे, त्याची भरभराट होणे आणि ऊस उत्पादक शेतकरी बांधवांचे हित साधले जाणे महत्त्वाचे आहे. कारखान्याच्या प्रगतीसाठी तसेच शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आपले पूर्ण समर्थन आणि पाठबळ राहील. कारखान्याने यशस्वीपणे वाटचाल करून शेतकरी व कारखान्याशी संबंधित सर्व घटकांना लाभ मिळवून द्यावा, अशा सदिच्छाही त्यांनी व्यक्त केल्या.

कारखान्याच्या प्रगतीसाठी सहकार्य करणार- आ. पावरा

आमदार काशिराम दादा पावरा यांनीही कारखाना सुरळीतपणे सुरू राहण्यासाठी आवश्यक ते सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे सांगितले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देऊन माँ रेवा शुगर्स व्यवस्थापनाने योग्य निर्णय घ्यावेत आणि कारखान्याच्या भरभराटीसाठी प्रयतक करावेत, असे आवाहन त्यांनी केले. कारखान्याच्या माध्यमातून तालुक्यातील शेतकऱ्यांना आधार मिळावा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

नव्या गळीत हंगामासाठी कारखाना सज्ज

कारखान्याचे जनरल मॅनेजर गणेश यादव यांनी गळीत हंगाम २०२६-२७ च्या तयारीबाबत माहिती दिली. यंदाच्या हंगामात गळीत प्रक्रिया अधिक कार्यक्षम, सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. ऊस उत्पादक शेतकरी हे कारखान्याच्या कामकाजातील महत्त्वाचे घटक असून, ऊसतोडणी, ऊस वाहतूक आणि गळीत प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने व निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी कारखाना कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मान्यवरांचा सत्कार

कार्यक्रमाच्या प्रारंभी आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम दादा पावरा, लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल आणि उपस्थित मान्यवरांचा माँ रेवा शुगर्स प्रा. लि.चे संचालक अंकित गोयल व परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम दादा पावरा, लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, माँ रेवा शुगर्स प्रा. लि.चे संचालक अंकित गोयल, शिरपूर शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन माधवराव पाटील, व्हाईस चेअरमन दिलीप पटेल, संचालक के. डी. पाटील, वासुदेव देवरे, राहुल रंधे, धनंजय पाटील, नारायणसिंग चौधरी, संग्रामसिंग राजपूत, भरत पाटील, सौ. सुचिताताई पाटील, प्रकाश चौधरी, ड. बाबा पाटील यांच्यासह कारखान्याचे सर्व संचालक, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नोव्हेंबरच्या सुरुवातीला गळीत हंगाम सुरू होईल

साखर कारखान्याच्या गळीत हंगामाच्या दृष्टीने बॉयलर अग्निप्रदीपन हा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. माँ रेवा शुगर्सचा आगामी गळीत हंगाम यशस्वी होऊन शेतकरी बांधवांना लाभ मिळावा आणि कारखान्याची प्रगती व्हावी, अशी अपेक्षा यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

NAME CHANGE

MY PREVIOUS NAME WAS
AQEELA BANO HABIBURRAHEMAN
AND MY NEW NAME IS
AQUEELA BANO HABIBURRAHEMAN
ADD- L NO.7 MACHHLI BAZAR KASAB WADA DHULE-424001. (M.S.)

CHANGE NAME

MY OLD NAME WAS
SHAIKH HAMEED SHAIKH JAEER
MY NEW NAME IS
SHAIKH HAMID SHAIKH ZAHIR
ADD- NEAR KAZI WADA MASJID AKBAR CHAUK, DHULE-424001.

CHANGE OF NAME

I have Change
My Old Name From
AAMERA KAUSAR ASIF AHMAD ANSARI
To My New Name
AAMERA KAUSAR MOHAMMAD FAIZ ANSARI
as per Documents
ADD- PLOT NO.35 VADJAI ROAD MILLAT NAGAR MADARSA, FALAH DARAIN, DHULE

NAME CHANGE

MY PREVIOUS NAME WAS
ABDUL RAHIM ABDUL HAMID
AND MY NEW NAME IS
ABDUL RAHEEM ABDUL HAMID ANSARI
ADD- PLOT NO.118 LANE NO.14 MADHAVPURA MACCHI BAZAR NEAR TIMMAL MAMA DHULE-424001. (M.S.)

CHANGE OF NAME

I have Change
My Old Name From
MOHAMMAD AASIF ABDUL AJIJ ANSARI
To My New Name
ASIF AHAMAD ABDUL AJIJ
as per Documents
ADD- PLOT NO.23 VADJAI ROAD BEHIND GAFUR NAGAR MASJID GAFUR NAGAR, DHULE

प्रकाश में आज- ये रात फिरना आयेगी



विश्वजीत पृथ्वीराज शर्मीलर टॉगोर मुमताज हेलन शैलेश कुमार मधुमती

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते की,

आमचे आशिल श्री. डॉ. सुहास गजानन जोशी, रा. देवपुर धुळे हे खाली नमुद केलेली स्थावर मिळकत तिचे विद्यमान मालक श्री चंदन कैलास वधवा व श्री. मयुर नरेंद्र तनेजा, रा. मित्रकुंज सोसायटी साक्री रोड, धुळे यांच्या कडून खरेदी करणार आहेत.

मिळकतीचा तपशील-

सर्वे नं. १०४ पैकी, प्लॉट नं. ९४ सि.स.नं. ८२५३ क्षेत्रफळ- ८००० चौ.फुट मौजे देवपुर ता.जि.धुळे

मिळकतीच्या चतु:सिमा

१) पूर्वेस - आग्रारोड व वापर रस्ता ३) दक्षिणेस - प्लाट नं. ९७
२) पश्चिमेस - ओपन स्पेस ४) उत्तरेस - प्लॉट नं. ७८

सदर मिळकतीवर कोणत्याही व्यक्तीचा मालकी हक्क, सहमालकी हक्क, वारस हक्क, गहाण, बोजा, ताबा, करार, न्यायालयीन वाद अथवा अन्य कोणत्याही हक्क किंवा हितसंबंध असल्यास अशा व्यक्तीने या नोटीशीच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्का संबंधीचे मुळ कागदपत्र व लेखी हरकत खालील पत्त्यावर सादर करावी.

निर्धारित मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास उपलब्ध कागदपात्रांच्या आधारे पुढील खरेदी व्यवहार करण्याचा विचार आहे. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या हरकतीचा विचार करणे बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण- धुळे
दिनांक - २१/१०/२०२६

ॲड. विजय एम. वाघ
ॲडव्होकेट व नोटरी, धुळे
२०, श्रीराम कॉलनी, वाडीभोकर रोड, देवपूर धुळे., धुळे-४२४००२
९८२२७६०१९२

जाहीर नोटीस

तमाम जनतेस, तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मौजे धुळे ता.जि.धुळे येथील गट क्रमांक व उपविभाग नं.४११/१/३/ पैकी प्लॉट नं.१०८, चे एकुण क्षेत्र ५०.६० चौ.मी. अशी बखळ प्लॉट त्याची चतु:सिमा नकाशा रेकॉर्डप्रमाणे.**

सदर सविस्तर नमूद केलेली मिळकत ही मो. साबीर सगीर अन्सारी, रा. ८०, फुटी रोड, काजी प्लॉट, नटराज टॉकीज जवळ, धुळे, ता.जि.धुळे. याचे नावे व कब्जे ताबेउपभोगात आहे. सदर मिळकतीचा खरेदी करण्याचा व्यवहार आमचे पक्षकार अरशद इदफान तांबोळी, रा. जलील चक्की मिलजवळ, वल्लीपुरा, धुळे, ता.जि.धुळे यांनी मिळकत मालकांशी व्यवहार केलेला असून त्याबाबतची बयाणा देखील दिलेला आहे. व त्याचप्रमाणे आमचे पक्षकार हे लवकरच खरेदीखत देखील नोंदविणार आहे.

तरी सर्वना या जाहिर नोटीसणे कळविण्यात येते की, सदर मिळकत सबंधी कोणाचाही कुठल्याही प्रकारे सौदा पावती, हक्क, हित, साबंध देणे घेणे, मालकी हक्क, भोडेपटटा, व लीज, ताबा, गहाण, दान, बोजा, कर्ज, लीज, टाच, वा वारस हक्क, खावटी दृ म.जु. वगैरे कोणत्याही व कुठल्याही प्रकारे हक्क व अधिकार असल्यास सदर नोटीस जाहीर झाल्याचे (०७) सात दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्राची प्रती सहीत आमचे ऑफिसात हरकती सादर कराव्यात. परस्पर जाहीर नोटीस वर्तमानपत्रावर असल्यास त्या ग्राहय धरण्यात येणार नाही. व हरकती न असल्यास आमचे पक्षकार सदर मिळकत निर्वेध व निर्बोज म्हणुन खरेदी करतील. त्यानंतर आलेल्या हरकती हया ग्राहय धरल्या जाणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.
धुळे.
दिनांक :- १४/१०/२०२६

ॲड.परवेझ निसार तांबोली
३५,अविशकार कॉलनी, चाळीसगांव रोड, धुळे
७०२०३८१३९४

टायटल व्हेरिफिकेशनसाठी नोटीस

तमाम जनतेस बँक पतपेढी, पतसंस्था, वित्तिय संस्था, सावकार तसेच सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु.जि.धुळे पो.तु.ता.धुळे पैकी मौजे धुळे **ता.जि.धुळे येथील स.नं.३७१/१ यांस फायनल प्लॉट नं.८२ यापैकी प्लॉट नं.२१ चे क्षेत्र ५४० चौ.मी.चा बखळ प्लॉट,यासी चर्तुसिमा** – पुर्वेस-६ मी रस्ता, पश्चिमेस-चाळीसगांव रोड, उत्तरेस-६ मी रुंदीचा रस्ता, दक्षिणेस-६ मीटर रुंदीचा रसता,येणे प्रमाणे वर्णनाचा आतील बखळ प्लॉट **श्री.संजय किसनराव खोपडे** रा.चाळीसगांव रोड,धुळे यांच्या मालकीचे व ताबेउपभोगातील आहे. सदर वरील नमुद बखळ प्लॉट हा कायम खरेदीने विक्री करण्याचा सौदा करणार आहे.

तरी वर नमुद वर्णनाच्या मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे कुठल्याही स्वरूपाचे हक्क व अधिकार असतील तसेच न्यायीक व इतर प्रकरणे असल्यास पुराव्यानिशी लेखी हरकती सदर पत्यावर सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात कागदपत्री पुरावासह नोंदवाव्यात. ७ दिवसानंतर आलेल्या हरकती ग्राहय धरण्यात येणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमान पत्रात घेतलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. मुदतीनंतर आलेल्या हरकती आमच्या अशिलावर व वर नमुद मिळकतींवर बंधनकारक राहणार नाहीत व सदर मिळकत निर्बोज व हस्तांतरणीय आहे असे समजण्यात येईल याचीही नोंद घ्यावी.

मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास सदर बखळ प्लॉट निर्वेध व निर्बोज समजुन मिळकतीचे धारक बखळ प्लॉट चे विक्रीचा व्यवहार करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी त्यांच्यावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस ही श्री.संजय किसनराव खोपडे यांच्या सुचनेवरून आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

दिनांक १९/१०/२०२६
स्थळः धुळे

(ॲड. अनिल सुरेश अग्रवाल)
ग.नं.४, भांडी बाजार, कांती कॉम्पलेक्स शेजारी,धुळे
७७०९७७२७५७,७५८८८८४१०७

टायटल व्हेरिफिकेशनसाठी नोटीस

तमाम जनता, वित्तीय संस्था, पतसंस्था, बँका यांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे देवपुर ता.जि धुळे येथिल महानगरपालिका हद्दी मधील सर्व्हे नं ६५/२+३+४+५+६ अ पैकी प्लॉट नं.१४, क्षेत्र चौ.मी. १८०, (सि.स.नं. १४४२) त्यास चतु:सिमा पुर्वास रस्ता, पश्चिमेस प्लॉट नं. ८, दक्षिणेस प्लॉट नं. १५, व उत्तरेस स.नं. ६५/१ हा बखळ प्लॉट श्री. ज्ञानेश्वर नारायण माळी रा. वरखेडे ता.जि.धुळे यांचे ताबे उपभोगातील व वहिवाटीतील व स्वसंपादीत आहे, सदर बखळ प्लॉट मधील दक्षिणेकडील निम्मे भाग आमचे अशिल यांनी सतिष विनायक चव्हाण रा देवपुर धुळे यांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचा सौदा केलेला आहे, व तसेच आमचे अशिलाने बयाणपोटी रक्कम अदा केली आहे, आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार लवकरात लवकर करणार आहे,

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार हिस्सा, अगर हितसंबध असल्यास तसेच कोणत्याही प्रकारचा गहाण, टाच, तारणाचा अगर अन्य प्रकारचा बोजा असल्यास व सदर मिळकत कोणास दान, बक्षीस म्हणुन देण्यात आलेली असल्यास अगर इतर कोणतीही हरकत अथवा सदर मिळकतीचे खरेदीचे व्यवहारास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हकरत असल्यास त्यानी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ८ (आठ) दिवसाच्या आत लेखी स्वरूपात मुळ दस्तऐवजसह आमचेकडे खालील पत्त्यावर हरकती नोंदवाव्या. वरील मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकतीवर कोणाचाही हक्क नाही असे समजुन पुढील व्यवहार करण्यात येईल, तद्नंतर कोणाची ही अक्षेप /हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

धुळे

ग.स.बँक सभासदांना वर्गणी व्याज वाटप

धुळे, दि.२१- धुळे व नंदुरबार जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी बँकेच्या सभासदांच्या जमा असलेल्या वर्गणीवर वर्गणी व्याज वाटप करण्यात येणार असल्याचा निर्णय मासिक सभेत घेण्यात आला.

बँकेची मासिक सभा दि.१८ ऑक्टोबर २०२६ रोजी घेण्यात आली. यावेळी बँकेच्या सभासदांनी जमा असलेल्या वर्गणीवर वर्गणी व्याज वाटप बाबत चर्चा करण्यात आली. वर्गणी व्याज सेव्हिंग खाती जमा केले असून दि.२१ ऑक्टोबर २०२६ पासून वर्गणी व्याज वाटप करण्याबाबत निर्णयस मासिक सभेत घेण्यात आला. वर्गणी व्याजाचा लाभ घ्यावा. असे आवाहन बँकेचे गटनेता निशांत विश्वासराव रंधे, पॅनल प्रमुख संजय वेडू शिंदे, चेअरमन शशांक विश्वासराव रंधे, व्हा.चेअरमन बापुराव अर्जुन पाटील सर्व संचालक मंडळ तसेच बँकेचे प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

धुळे, दि.२१- खान्देशची ऐतिहासिक राजधानी आणि सांस्कृतिक केंद्र असलेल्या धुळे शहराचा समृद्ध इतिहास, प्राचीन मंदिरे, अद्वितीय शिल्पकला आणि दुर्लक्षित राहिलेल्या वारशाची सफर घडवणाऱ्या धुळे इतिहास, वारसा आणि संस्कृती या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा

आय.एम.ए.हॉलमध्ये पुस्तक प्रकाशन सोहळा

दि.२४ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. इंद्रनील सदानंद बंकापुरे लिखित या पुस्तकाचे प्रकाशन धुळे येथील आय.एम.ए. हॉलमध्ये सायंकाळी ५:०० वाजता पार पडणार आहे.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून सी.ए.प्रकाश पाठक तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. श्विलास पुराणिक उपस्थित राहणार आहेत. धुळे शहराच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्वाचा वेध घेणारे हे पुस्तक शहरातील इतिहासप्रेमी, अभ्यासक आणि नागरिकांसाठी मोलाचा ऐवज ठरणार आहे. पुस्तकाची मूळ किंमत १४९/- रुपये असून, प्रकाशन सोहळ्याच्या दिवशी हे पुस्तक उपस्थितांसाठी विशेष सवलतीच्या दरात म्हणजेच केवळ ९९/- रुपयांमध्ये खरेदीसाठी उपलब्ध करून दिले जाणार आहे.

धुळे शहरावर प्रेम करणाऱ्या सर्व नागरिक, इतिहासप्रेमी आणि वाचकांनी या आनंदसोहळ्यास साक्षीदार होण्यासाठी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक डॉ. केतकी म्हस्कर बंकापुरे, शिल्पा म्हस्कर आणि डॉ.मंदार म्हस्कर यांनी केले आहे. वेळेचे नियोजन लक्षात घेऊन रसिकांनी कार्यक्रमाच्या १० मिनिटे आधी सभागृहात उपस्थित राहावे, अशी विनंतीही आयोजकांतर्फे करण्यात आली आहे.

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

CHANGE OF NAME

I have Change
My Old Name From
ASIF AHMAD ABDUL AJIJ ANSARI
To My New Name
ASIF AHAMAD ABDUL AJIJ
as per Documents
ADD- PLOT NO.23 VADJAI ROAD BEHIND GAFUR NAGAR MASJID GAFUR NAGAR, DHULE

CHANGE OF NAME

I have Change
My Old Name From
SHIREEN BANO ASIF AHMAD ANSARI
To My New Name
SHEEREEN BANO ASIF AHMAD
as per Documents
ADD- PLOT NO.23 VADJAI ROAD BEHIND GAFUR NAGAR MASJID, GAFUR NAGAR, DHULE

NAME CHANGE

MY PREVIOUS NAME WAS
NASIR AHMED SHABBIR AHMED
AND MY NEW NAME IS
NASIR SHABBIR BAGWAN
ADD- SHIVAJI NAGAR VADJAI ROAD OPP DR.FAROOQUE SHAH DHULE-424001. (M.S.)

CHANGE OF NAME

I have Change
My Old Name From
FAIZAH PARVEEN MOHAMMAD AASIF ANSARI
To My New Name
FAIZAH PARVEEN MOHAMMAD UZAIR ANSARI
as per Documents
ADD- NANDI ROAD MUNCIPAL COLONY, FIRDOUS NAGAR, DHULE

जाहीर नोटीस

तमाम लोकांना सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, यांना जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धुळे येथील धुळे म.न.पा.हद्दीतील स.नं.४८५/अ/१ यापैकी प्लॉट नं.४४ चे एकूण क्षेत्र २०० चौ.मी.बखळ प्लॉट यास वि.सि.स.नं. ९०६२ असा लागलेला आहे. यासी चतु:सिमा पूर्वेस-रस्ता, पश्चिमेस - प्लॉट नं.३५, दक्षिणेस - प्लॉट नं.४५, उत्तरेस-प्लॉट नं.४३

येणेप्रमाणे वर्णनाच्या वचतु:सिमेच्या आतील मिळकत बखळ प्लॉट हा श्री विशाल अशोक मलारा व श्री रिखील राजेंद्र शामसुखा दोघे रा.महावीर सोसा., मालेगांव रोड,धुळे यांचे सामाईक मालकीचे ताबे उपभोगातील आहे. सदर वरीलप्रमाणे प्लॉट हा आमचे अशिल यांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला आहे. व त्यापोटी बयाणा रक्कम दिलेली आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

